ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार ३ जुलै. १९६८ | अंक १३



## कर्जमंजुरीनंतर कर्जवापरात दिरंगाई

### भारताने दंडाखातर २ कोटी रु. भरले

भारताने १९ देश, जागतिक बँक आणि इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशन ह्यांच्याशी कर्जविषयक १९६७ अखेर जे करार केले होते, त्या करारांन्वये मिळावयाच्या कर्जापैकी भारत ८४% कर्जाचा वापर करू शकला. विशेषतः विद्युत्-उत्पादनासाठी मंजूर केलेल्या कर्जाचे बाबतीत वापराचे प्रमाण विशेष असमाधानकारक होते. कित्येक कर्जाच्या अटीत 'कमिटमेंट चार्जेस'ची एक अट असते. जेवढ्या रकमेचा विनियोग केला गेला नाही किंवा उशीरा केला गेला, त्यावर हे चार्जेस भारताला भरावे लागतात; अशा प्रकारे भारताने २ कोटी रु. दंड भरला आहे. जागतिक बँक आणि कॅनडा ह्यांचा ह्या दंडाचा दर ३/४ % आहे पश्चिम जर्मनीचा १/४ % तर नेदरलंडसचा १/६ % आहे आणि अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेचा १/२ % आहे. कर्जाच्या करारावर सही झाल्यावर ६० दिवसांनीच जागतिक बँकेला हा चार्ज द्यावा लागतो. पश्चिम जर्मनी ९० दिवस थांबतो. भारताने ह्या दंडापायी एकट्या जागतिक बँकेलाच १·८० कोटी रु. दिले आहेत. हा कमिटमेंट चार्ज आमचेवर लादू नका, निदान तो देण्यास उशिरात उशिराची सवलत द्या, अशी धनकोंना ऋणको भारताची नम्र विनंती आहे.

---

## चिनी जिनसांची भरपूर चोरटी आयात

उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यात चीनमधून चोरट्या मार्गाने आणलेल्या जिनसा कमालीच्या स्वस्त दरात मिळू शकतात. ज्या हिंदी ट्रॅन्झिस्टरला ३०० ते ३५० रु. पडतात, त्याच चिनी ट्रॅन्झिस्टरला १०० ते १५० रु. च द्यावे लागतात. ४·५० रुपयांना मिळणारी टूथपेस्ट १·५० रुपयास मिळू शकते. चिनी घड्याळे ५० ते ६० रु. स मिळाल्यावर तेथे हिंदी एच. एम. टी. घड्याळे कोण घेणार? नेपाळमार्गे ह्या सर्व जिनसा बस्ती जिल्ह्याच्या नवगड तालुक्यात प्रवेश करतात.


---

## राजस्थानातील लॉटरींची योजना


लॉटऱ्या चालविण्यासाठी राजस्थान सरकारने एक योजना आखली आहे. राजस्थानच्या डायरेक्टर ऑफ लॉटरीजला केरळातील लॉटऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी तेथे पाठविले होते. चालू वर्षी एक तरी लॉटरी काढण्यात येईल. जमेपैकी १०% रकमेचा विनियोग बक्षिसांसाठी करण्यात येईल. उत्पन्नातून प्राथमिक शाळांच्या इमारती बांधणे, खेडेगावांत वीजपुरवठा, पिण्याचा पाणीपुरवठा, शेतीस पाणीपुरवठा, इत्यादी कामे केली जातील.

---


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )



**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.**

**मुंबई**

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

: विभागीय कचेरी : — महाल नागपूर.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ६,१३,४५,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | ५,७२,४१,००० |
| ठेवी | ... रु. | ५०,९५,६६,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,०६,६५,९६ ००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. पु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. — श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

☆ अर्थ ☆

बुधवार, ३ जुलै, १९६८



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## चवथ्या पंचवार्षिक योजनेच्या समस्या

परदेशी मदत आणि राष्ट्रीयीकरण हे हुकमी पत्ते आपले खेळून झालेले आहेत, हे लक्षात ठेवूनच ४ थ्या पंचवार्षिक योजनेबाबत अपेक्षा बाळगायला हव्यात, असे डॉ. धनंजयराव गाडगीळ हे त्रिवेंद्रम येथील आपल्या एक भाषणात म्हणाले. परदेशी मदतीमुळे वेगवेगळे उद्योगधंदे उभारणे आपणांस सत्वर शक्य झाले, पण त्याला जरुरीपेक्षा जास्त किंमत द्यावी लागली आहे आणि त्या कर्जाचे व्याज आणि मुद्दलफेड ह्यांचा बोजा आपल्या परराष्ट्रीय देण्या-घेण्याच्या व्यवहारावर दीर्घ काळ पडणार आहे. आयात-निर्यातीचे धोरण बरेच बदलावे लागणार आहे. परदेशी मदत योग्य की अयोग्य हा प्रश्न आता उरला नसून, ह्या मदतीचा आकार कमी करण्याची आवश्यकता मात्र सर्वांस पटली आहे. पोलादाचे आणि मशीन उत्पादनाचे कारखाने सरकारी क्षेत्रात उभारले की प्रश्न सुटत नाही. सरकारी मालकीच्या कारखान्यातील गुंतवणुकीवर ५ ते ६ टक्के नफा सुटला असता, तर जनतेचा विश्वास वाढला असता. पण तसे घडलेले नाही. राष्ट्रीयीकरणाच्या तोडग्याला आता कुणी साद देणार नाही. शेतीच्या उत्पादनवाढीचा प्रश्न महत्त्वपूर्ण आहे हे आता पटलेले आहे, पण लहान शेती आणि लहान शेतकरी ह्यांच्या समस्यांची उकल होऊ शकलेली नाही. सहकारी शेती हा त्यावरील तर्कशुद्ध उपाय खरा, पण तो उपाय अद्याप शक्य कोटीत आलेला नाही.

---

## आंतरराष्ट्रीय तेलकंपन्यांची भूमिका
## विकसनशील देशांना उपकारक

येत्या दहा वर्षांत तेलधंद्याला सबंध जगात मिळून हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागेल; ह्या प्रचंड रकमेचा मोठा हिस्सा भारताच्या वाट्यास यावयाचा असेल तर तो आकर्षित करण्यासाठी गुंतवणुकीस आवश्यक ते वातावरण भारताने निर्माण केले पाहिजे, असे एसो इंडियाचे जनरल मॅनेजर मि. जी. पी. केस हे भारतातील ३० वर्षांच्या कामानंतर एसोच्या न्यूयॉर्कमधील मुख्य कचेरीत कामासाठी जाण्यापूर्वी मुंबई येथे म्हणाले. आंतरराष्ट्रीय कंपन्या वैयक्तिक देशांच्या हितसंबंधास पोषक होऊ शकत नाहीत, उलट बाधक होतात, अशी कित्येक देशांत समजूत प्रसृत झाली आहे ती चुकीची असल्याचे त्यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय तेलकंपन्यांवर हा आरोप केला जातो, कारण विकसनशील देशांतील परदेशांची मोठी गुंतवणूक पेट्रोलियमच्या क्षेत्रात केली जात आहे. आंतरराष्ट्रीय तेलकंपन्या त्या त्या देशांशीच निष्ठावंत असतात असे नसून, त्या कंपन्या जागतिक हिताचीही जपणूक करतात. एखाद्या देशाच्या सरकारने दुसऱ्या देशाच्या सरकाराशी करार केले आणि ह्या दोन देशांत वितुष्ट आले तर ग्राहकदेशाला पुरवठा होणार नाही. पुरवठ्याचा अन्य मार्ग उपलब्ध असेल तरच ते शक्य होईल. एसोसारख्या आंतरराष्ट्रीय तेलकंपन्या तेलाचा पुरवठा सतत चालू ठेवू शकतात; त्यांच्यांत तेवढा लवचीकपणा असतो. गेल्या वर्षी पश्चिम आशियातील पेचप्रसंगाचे वेळी एसोच्या सहकारी कंपन्या आपले टँकर्स अन्य मार्गे पाठवून आणि पुरवठ्याच्या अन्य योजना करून आपल्या जगभर असलेल्या गिऱ्हाईकांच्या गरजा भागवू शकल्या. कच्चा माल, उत्पादन, वाहतूक, विक्री, इत्यादींचे बाबतीत आंतरराष्ट्रीय तेलकंपन्या स्वावलंबी असल्याकारणाने सर्व देशांचा तेलपुरवठा व्यवस्थित चालू शकतो. काही उत्पादनाच्या बाबींना एका देशात गिऱ्हाईक कमी झाले, तर दुसऱ्या देशात ते मिळविता येते; आंतरराष्ट्रीय कंपन्यांजवळ त्यासाठी आवश्यक ते बाजारपेठेचे ज्ञान, गिऱ्हाइकांचा प्रत्यक्ष परिचय, वाहतुकीची साधने, इत्यादी मुबलक प्रमाणात असतात. पुरेशी इंधनाची तेले, डिझेल तेले आणि केरोसीन उत्पादन करावयाचे म्हणजे नॅफताचे उत्पादन आपोआपच वाढते आणि त्याला बाजारपेठ परदेशात शोधावी लागते. आंतरराष्ट्रीय संबंध जोडलेले असले, तरच ती निर्गत शक्य होते. अशा वेळी आंतरराष्ट्रीय कंपन्या उपयोगी पडतात. भारताच्या तेलाच्या उत्पादनाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मि. केस ह्यांनी एसो कंपनीने भारतासाठी काय काय केले ते विशद करून सांगितले. १९५३ ते १९६६ ह्या मुदतीत एसोने भारतात ४५ कोटी रु. भांडवल गुंतविले आणि ह्या १३ वर्षांत मिळून १३ कोटी रुपये नफा घेतला.

भारतातील तेलधंद्याने कर आणि एक्साइजच्या द्वारा १९६६–६७ मध्ये ४०० कोटी रुपये दिले; त्यांपैकी एसोने ४० कोटी रुपये दिले. १९५४–६७ ह्या मुदतीत एसोने १०० कोटी रुपयांची भारताची परदेशी हुंडणावळ वाचवली. एसोने हजारो तज्ज्ञ हिंदी लोकांना वरिष्ठ जागा दिल्या. "निसर्गाने तेल कुठेही दडविलेले असले तरी ते भूगर्भशास्त्रज्ञ शोधून काढतात; तेलकंपन्यांतील आम्ही लोक त्या त्या देशातील हुशारीला वर येऊन फुलायला आवश्यक ते वातावरण निर्माण करतो" असा त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

## कमाल जमीनधारणा कायद्याविषयी सुप्रीम कोर्टाचा निवाडा

### बेलापूर कंपनीचे अपील मंजूर

महाराष्ट्र राज्याच्या कमाल जमीनधारणा कायद्यानुसार खाजगी साखरकारखान्यांच्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त असलेल्या जमिनी सरकारने आपल्या ताब्यात घेतल्या व त्यातून 'स्टेट फार्म' निर्माण करण्यात आले. ह्या स्टेट फार्मकडे खंडाने आलेल्या जमिनी आपल्याला परत मिळाव्यात अशी मागणी त्या जमिनीच्या मूळ मालकांनी केली असून तिला काँग्रेस व उजवा कम्युनिस्ट पक्ष यांनी पाठिंबा दिला आहे. जमिनी परत मिळण्याबद्दल शेत-मालकांच्या संघटनेने सत्याग्रह, उपवास वगैरे मार्गांचा अवलंब करून आपली मागणी धसास लावण्याचे ठरविले असून श्रीरामपूर, फलटण, वगैरे भागांतून त्या दिशेने हालचाल चालू असल्याच्या बातम्याही सध्या येत आहेत.


एका बाजूस मूळ शेतमालकांची मागणी तीव्र स्वरूप धारण करीत असताना बेलापूर साखर कारखान्याने महाराष्ट्र सरकार विरुद्ध सुप्रीम कोर्टात केलेले अपील जिंकले आहे. बेलापूर कंपनीची ३०१ एकर जमीन सरकारच्या ताब्यात घेण्याचा सरकारी हुकूम सुप्रीम कोर्टाने रद्दबातल ठरविला आहे. १९२० साली बेलापूर कंपनीने ७,३०० एकर जमीन ९९ वर्षांच्या करारावर खंडाने घेतली होती. १९६३ फेब्रुवारीमध्ये कंपनीकडे असलेल्या ११,२९८ एकर जमिनीपैकी ११,१९० एकर जमीन ही कमाल मर्यादेपेक्षा जास्त आहे असे ठरवून ती सरकारच्या ताब्यात घेण्याचा हुकूम काढला. ह्या विरुद्ध बेलापूर कंपनीने हायकोर्टाकडे धाव घेतली. पण हायकोर्टाचा निकाल कंपनीच्या विरुद्ध गेल्यामुळे तिने सुप्रीम कोर्टात अपील केले.

दरम्यान २० मे, १९६५ रोजी झालेल्या तडजोडीत असे ठरले की कंपनीला कमाल मर्यादेखालील १०८ एकर आणि कंपनीकडे ठेवण्यास मान्यता मिळालेली ३०१ एकर अशी एकूण ४०९ एकर जमीन ठेवण्यास मुभा मिळावी. याउलट, कंपनीने आपले सुप्रीम कोर्टाकडील अपील काढून घ्यावे.

यानंतर सरकारने कंपनीस असे कळविले की, बिगर-शेतीसारा भरण्याच्या अटीवर सरकारने कंपनीस ३०१ एकर जमीन ठेवण्यास परवानगी दिली होती पण त्यावर तसा सारा न आकारला गेल्यामुळे सरकारने दिलेली परवानगी रद्द करण्यात येत आहे. याबाबत सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिला आहे की, मूळ जमीन खंडाने घेताना तिचेवर शेती-सारा आकारण्याचे ठरले होते, आणि ३०१ एकर इतकी जमीन कमाल-जमीनधारणा कायद्याच्या कक्षेबाहेरील आहे. सचोटी व सद्भावना यांची वाढ होईल अशाच तऱ्हेचा न्याय कोर्टाने द्यावा, असे सुप्रीम कोर्टाने आपल्या निकालपत्रात म्हटले आहे.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन
आपली चलनी नोट
लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'
किंमत ५० पैसे



अधिक धान्योत्पादन!
अधिक फायदा!!
अधिक बचत!!!
यांसाठी
किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
यांचीच निवड आवश्यक आहे...
कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिने, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यांस उपयुक्त आहेत. किर्लोस्कर एंजिनें चालविण्यांस लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सला लागणाऱ्या खर्चाच्या मानानें फारच कमी येतो.

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत).

## स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि. च्या उत्पादनात, नफ्यात, डिव्हिडंडमध्ये वाढ

### श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचे अध्यक्षीय भाषण

### ( २० जून, १९६८ )

देशातील बहुतेक उद्योगधंद्यांमध्ये आर्थिक मंदीची लाट पसरली असली तरी तिचा जबरदस्त तडाखा इंजिनिअरिंग उद्योगधंद्यांना बसला असून, अशा उद्योगधंद्यांवर अवलंबून असलेले अनेक व्यवसाय यावरही आर्थिक मंदीचे दुष्परिणाम झाले आहेत. परंतु सुदैवाने आपली कंपनी या आर्थिक मंदीच्या लाटेतून सुखरूपपणे सुटून मार्गक्रमण करीत आहे. या परिस्थितीत व्यवस्थापनाचे कुशल कार्य आपल्या दोनही कार्यकारी संचालकांच्या नेतृत्वामुळे झाले आहे, हे नमूद करावेसे वाटते.

१९६३ ते १९६४ सालासाठी आपल्या कंपनीने इक्विटी शेअर्सवर ९ टक्के लाभांश दिला. १९६५ ते १९६६ मध्ये तो १० टक्क्यांपर्यंत वाढविला. मला मोठ्या आनंदाने सांगावेसे वाटते की या वर्षी संचालक मंडळाने आपण अनुमती दिल्यास तो १२ टक्के द्यावा अशी शिफारस केली आहे. आपण सर्व त्याचे स्वागत करून त्यास अनुमती द्याल अशी आशा आहे.

उत्पादनक्षेत्रात कंपनीने १९६० च्या ९४ लाख रुपयांवरून १९६७ मध्ये ३·३ कोटी रुपयांपर्यंत मजल गाठली आहे. कंपनीने ५·७ लाख रुपयांवरून ( १९६० मध्ये ) १९६७ मध्ये ४०·८ लाख रुपये एकूण नफा मिळविला. आपली कंपनी विविध वस्तूंच्या उत्पादनकार्यात नेहमीच अग्रेसर असून आता कंपनीने पादत्राण व्यवसायात पदार्पण करून या क्षेत्रात एक नवीन टप्पा गाठला आहे. त्याकरिता चिंचवड औद्योगिक विभागात अकुर्डी येथे ८० एकर जमीन घेतली असून तेथे लवकरच एक वैभवशाली वास्तू मूर्त स्वरूप धारण करीत आहे. चपला, सँडल्स, कॅनव्हस शूज, वगैरे अनेक प्रकारची आपली पादत्राणे दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत असून आपल्या या मालास ग्राहकांकडून चांगल्या प्रकारे प्रोत्साहन मिळत आहे.

कंपनीने सध्या रबरी प्रक्रिया केलेल्या 'स्वस्तिक फोम'च्या गाद्यागिर्द्या, उशा व तक्के यांचे उत्पादन हाती घेतले असून सदर माल बाजारात विक्रीस आणला आहे. मला विश्वास आहे की, आपल्या इतर मालाप्रमाणेच 'स्वस्तिक फोम' मालाला भरपूर नफा होऊन कंपनीच्या वैभवात व कीर्तीत त्याने भर पडेल.

या व अशा प्रकारच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजनांचे कार्यपूर्तीसाठी कंपनीस आज एक कोटी रुपयांहून अधिक भांडवलाची गरज आहे. बँकांकडून व इतर मार्गे मिळविलेल्या पैशाव्यतिरिक्त कंपनीने १०० रुपयांचा एक, असे २५ हजार इक्विटी शेअर्स विक्रीस काढण्याचे ठरविले आहे. हे इक्विटी शेअर्स प्रथमतः सध्याच्या इक्विटी शेअरहोल्डर्सना विकण्यात येतील, आणि म्हणून आपण मोठ्या उदारतेने त्यांचा स्वीकार करून कंपनीच्या हाती घेतलेल्या उत्पादन-उद्दिष्टांना हातभार लावावा अशी मी आपणास विनंती करतो.

आपल्या मालास स्पर्धायुक्त परदेशी बाजारपेठांमधून चांगलीच साथ मिळत असून सुमारे चाळीस लाख रुपयांचा माल आजपर्यंत आपण निर्यात केला आहे. निर्यातीच्या अनेक नव्या मागण्या आपल्याकडे आल्या असून दर्जेदार माल पुरवून त्या आपण नजीकच्या भविष्यकाळात पुऱ्या करू असा आत्मविश्वास वाटतो. भविष्यकाळात आपली निर्यातक्षेत्रातील ही भरभराट सतत वाढणार असून त्यातून आपणास भरघोस मोबदला मिळेल यात शंका नाही.

रबरवस्तू उत्पादन करणाऱ्या कारखानदारांपुढे असलेल्या काही समस्यांकडे मी आता आपले लक्ष वेधू इच्छितो.

या व्यवसायातील काही वर्तमानकालीन प्रश्नांकडे पाहता अपुरा पडणारा कच्च्या मालाचा पुरवठा हा एक महत्त्वाचा प्रश्न वाटतो. १९६८-६९ मध्ये देशात सुमारे २३,००० टन नवीन रबराचा तुटवडा निर्माण होईल. अशा परिस्थितीत रबरबोर्डाने रबराची आयात न करण्याबद्दल ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्यामुळे खुल्या बाजारात रबराची मोठी टंचाई निर्माण होऊन किमतीमध्ये भरमसाठ वाढ झाल्याखेरीज राहणार नाही. असे असता रबरपुरवठा क्षेत्रात देश स्वयंपूर्ण होईपर्यंत भारत सरकारने रबर आयातीस परवाने देणे अत्यावश्यक ठरेल व त्यामुळेच ग्राहकांना नियंत्रित किमतीने रबरपुरवठा करणे शक्य होईल.

रबरवस्तू-कारखानदारांना भेडसावीत असलेली आजची दुसरी समस्या म्हणजे वस्तूंच्या निर्यातीबाबत. रुपयाचे अवमूल्यन झाले, त्याचबरोबर भारत सरकारने रबरवस्तू-कारखानदारांच्या निर्यात-उत्तेजन सवलतीत बदल घडवून आणले, ही एक खेदजनक बाब आहे. त्यात सरकारने रबरवस्तूंच्या निर्यातीबद्दल आयात परवान्यामध्ये देण्यात येणाऱ्या मूल्यांमध्ये काही वस्तूंवर तर ७५ टक्क्यांपासून २० टक्क्यांपर्यंत व काही विशिष्ट वस्तूंवर निर्यातीत १० टक्क्यांपर्यंत कपात केली आहे.

याचा परिणाम, सुमारे ५६ लाख रुपयांनी रबरवस्तूंची निर्यात कमी होण्यात झाला आहे.

रबरवस्तू-कारखानदार व त्या वस्तू निर्यात करणाऱ्यांच्या लायसेन्सबाबतच्या रास्त अडीअडचणींचा सरकारकडून सहानुभूतिपूर्वक विचार वेळीच केला गेला नाही तर रबरवस्तू निर्यात-क्षेत्रात अधिकाधिक घट झाल्याखेरीज राहणार नाही अशी भीती वाटते.

याखेरीज नैसर्गिक रबर, एस. बी. आर. सिंथेटिक रबर, कार्बन ब्लॅक संबंधित रसायने, रेआन कॉर्ड व फेब्रिक, इत्यादी

विविध वस्तूंच्या आजच्या किमतीचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

सरकारने प्राधान्य दिलेल्या उद्योगधंद्यांच्या यादीत रबर व्यवसायाची गणना करावी व त्याचबरोबर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने व्याज दराच्या दृष्टीने सर्वच उद्योगधंद्यांना समान लेखावे व त्यानुसार व्यवहार करावा.

गतवर्षी व्यवस्थापक व कामगार यांचे संबंध फारच आपुलकीचे व जिव्हाळ्याचे असे राहिले, याचे श्रेय दोघांनाही असून त्यामुळे गतवर्षी औद्योगिक शांतता नांदू शकली. माझी खात्री आहे की, दोघांसही लाभदायक असलेली शांतता भविष्यकाळातही टिकेल. कंपनीतर्फे व आपल्या सर्वांतर्फे डायरेक्टर मंडळात नुकतेच समाविष्ट झालेले आणि आता निवडणुकीस उभे असलेले आपले नवे संचालक सौ. जयश्री वैद्य व श्री. बी. जी. वैद्य यांचे मी स्वागत करतो, व त्यांची निवड आपल्या कंपनीला विविधरीत्या लाभदायक ठरेल अशी आशा व्यक्त करतो.

---

### वॉशिंग्टन येथील विठ्ठलमंदिर

विठ्ठलाची एक मूर्ती मद्रासहून वॉशिंग्टनला नुकतीच विमानाने पाठविण्यात आली. संत भद्रगिरी केशवदास ह्या साधूच्या अमेरिकन शिष्यांनी उभारलेल्या मंदिरात त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाईल. वॉशिंग्टनमधील ह्या पहिल्या हिंदू मंदिराचे उद्घाटन स्वामीजी जुलैच्या पहिल्या आठवड्यात करतील.

---

### रजिस्ट्रेशनचे नवे पाकीट

रजिस्ट्रेशनचे नवे पाकीट दिल्ली, मुंबई, कलकत्ता आणि मद्रास येथे मिळू लागले आहे. त्याची किंमत १ रुपया ( त्यात पाकिटाची किंमत १० पैसे ) आहे.

### मिझो खेड्यांतील काडीमोड

असाममधील मिझो खेड्यांतून अजून जुन्या पद्धतीनेच काडीमोड होतो. एखाद्या दांपत्यात तंटा झाला, तर पतिपत्नीला एका लहान खोलीत रात्रभर कोंडून ठेवतात. सकाळपर्यंत त्यांच्यात समझोता झाला नाही, तर खेड्याचे पंचमंडळ विवाह विच्छेदन करते. काडीमोडानंतर दोघेही पुन्हा विवाह करू शकतात.

---

### दोन मजली बसेस

नाशिक ते नाशिक रोड स्टेशन ह्या रस्त्यावरील दुमजली बसेसचा प्रयोग यशस्वी झाला आहे; १०५ सीटसच्या ह्या बसेस वसई–वसई रोड स्टेशन, सांगली–मिरज, नाशिक–त्र्यंबकेश्वर ह्या एस. टी मार्गावरही चालू करण्यात येणार आहेत.

---





सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.


— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–२८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

## स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि. च्या उत्पादनात, नफ्यात, डिव्हिडंडमध्ये वाढ

### श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचे अध्यक्षीय भाषण

### ( २० जून, १९६८ )

देशातील बहुतेक उद्योगधंद्यांमध्ये आर्थिक मंदीची लाट पसरली असली तरी तिचा जबरदस्त तडाखा इंजिनिअरिंग उद्योगधंद्यांना बसला असून, अशा उद्योगधंद्यांवर अवलंबून असलेले अनेक व्यवसाय यावरही आर्थिक मंदीचे दुष्परिणाम झाले आहेत. परंतु सुदैवाने आपली कंपनी या आर्थिक मंदीच्या लाटेतून सुखरूपपणे सुटून मार्गक्रमण करीत आहे. या परिस्थितीत व्यवस्थापनाचे कुशल कार्य आपल्या दोनही कार्यकारी संचालकांच्या नेतृत्वामुळे झाले आहे, हे नमूद करावेसे वाटते.

१९६३ ते १९६४ सालासाठी आपल्या कंपनीने इक्विटी शेअर्सवर ९ टक्के लाभांश दिला. १९६५ ते १९६६ मध्ये तो १० टक्क्यांपर्यंत वाढविला. मला मोठ्या आनंदाने सांगावेसे वाटते की या वर्षी संचालक मंडळाने आपण अनुमती दिल्यास तो १२ टक्के द्यावा अशी शिफारस केली आहे. आपण सर्व त्याचे स्वागत करून त्यास अनुमती द्याल अशी आशा आहे.

उत्पादनक्षेत्रात कंपनीने १९६० च्या ९४ लाख रुपयांवरून १९६७ मध्ये ३·३ कोटी रुपयांपर्यंत मजल गाठली आहे. कंपनीने ५·७ लाख रुपयांवरून ( १९६० मध्ये ) १९६७ मध्ये ४०·८ लाख रुपये एकूण नफा मिळविला. आपली कंपनी विविध वस्तूंच्या उत्पादनकार्यात नेहमीच अग्रेसर असून आता कंपनीने पादत्राण व्यवसायात पदार्पण करून या क्षेत्रात एक नवीन टप्पा गाठला आहे. त्याकरिता चिंचवड औद्योगिक विभागात अकुर्डी येथे ८० एकर जमीन घेतली असून तेथे लवकरच एक वैभवशाली वास्तू मूर्त स्वरूप धारण करीत आहे. चपला, सँडल्स, कॅनव्हस शूज, वगैरे अनेक प्रकारची आपली पादत्राणे दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत असून आपल्या या मालास ग्राहकांकडून चांगल्या प्रकारे प्रोत्साहन मिळत आहे.

कंपनीने सध्या रबरी प्रक्रिया केलेल्या 'स्वस्तिक फोम'च्या गाद्यागिर्द्या, उशा व तक्के यांचे उत्पादन हाती घेतले असून सदर माल बाजारात विक्रीस आणला आहे. मला विश्वास आहे की, आपल्या इतर मालाप्रमाणेच 'स्वस्तिक फोम' मालाला भरपूर नफा होऊन कंपनीच्या वैभवात व कीर्तीत त्याने भर पडेल.

या व अशा प्रकारच्या अनेक महत्त्वाकांक्षी योजनांचे कार्यपूर्तीसाठी कंपनीस आज एक कोटी रुपयांहून अधिक भांडवलाची गरज आहे. बँकांकडून व इतर मार्गे मिळविलेल्या पैशाव्यतिरिक्त कंपनीने १०० रुपयांचा एक, असे २५ हजार इक्विटी शेअर्स विक्रीस काढण्याचे ठरविले आहे. हे इक्विटी शेअर्स प्रथमतः सध्याच्या इक्विटी शेअरहोल्डर्सना विकण्यात येतील, आणि म्हणून आपण मोठ्या उदारतेने त्यांचा स्वीकार करून कंपनीच्या हाती घेतलेल्या उत्पादन-उद्दिष्टांना हातभार लावावा अशी मी आपणास विनंती करतो.

आपल्या मालास स्पर्धायुक्त परदेशी बाजारपेठांमधून चांगलीच साथ मिळत असून सुमारे चाळीस लाख रुपयांचा माल आजपर्यंत आपण निर्यात केला आहे. निर्यातीच्या अनेक नव्या मागण्या आपल्याकडे आल्या असून दर्जेदार माल पुरवून त्या आपण नजीकच्या भविष्यकाळात पुऱ्या करू असा आत्मविश्वास वाटतो. भविष्यकाळात आपली निर्यातक्षेत्रातील ही भरभराट सतत वाढणार असून त्यातून आपणास भरघोस मोबदला मिळेल यात शंका नाही.

रबरवस्तू उत्पादन करणाऱ्या कारखानदारांपुढे असलेल्या काही समस्यांकडे मी आता आपले लक्ष वेधू इच्छितो.

या व्यवसायातील काही वर्तमानकालीन प्रश्नांकडे पाहता अपुरा पडणारा कच्च्या मालाचा पुरवठा हा एक महत्त्वाचा प्रश्न वाटतो. १९६८-६९ मध्ये देशात सुमारे २३,००० टन नवीन रबराचा तुटवडा निर्माण होईल. अशा परिस्थितीत रबरबोर्डाने रबराची आयात न करण्याबद्दल ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्यामुळे खुल्या बाजारात रबराची मोठी टंचाई निर्माण होऊन किमतीमध्ये भरमसाठ वाढ झाल्याखेरीज राहणार नाही. असे असता रबरपुरवठा क्षेत्रात देश स्वयंपूर्ण होईपर्यंत भारत सरकारने रबर आयातीस परवाने देणे अत्यावश्यक ठरेल व त्यामुळेच ग्राहकांना नियंत्रित किमतीने रबरपुरवठा करणे शक्य होईल.

रबरवस्तू-कारखानदारांना भेडसावीत असलेली आजची दुसरी समस्या म्हणजे वस्तूंच्या निर्यातीबाबत. रुपयाचे अवमूल्यन झाले, त्याचबरोबर भारत सरकारने रबरवस्तू-कारखानदारांच्या निर्यात-उत्तेजन सवलतीत बदल घडवून आणले, ही एक खेदजनक बाब आहे. त्यात सरकारने रबरवस्तूंच्या निर्यातीबद्दल आयात परवान्यामध्ये देण्यात येणाऱ्या मूल्यांमध्ये काही वस्तूंवर तर ७५ टक्क्यांपासून २० टक्क्यांपर्यंत व काही विशिष्ट वस्तूंवर निर्यातीत १० टक्क्यांपर्यंत कपात केली आहे.

याचा परिणाम, सुमारे ५६ लाख रुपयांनी रबरवस्तूंची निर्यात कमी होण्यात झाला आहे.

रबरवस्तू-कारखानदार व त्या वस्तू निर्यात करणाऱ्यांच्या लायसेन्सबाबतच्या रास्त अडीअडचणींचा सरकारकडून सहानुभूतिपूर्वक विचार वेळीच केला गेला नाही तर रबरवस्तू निर्यातक्षेत्रात अधिकाधिक घट झाल्याखेरीज राहणार नाही अशी भीती वाटते.

याखेरीज नैसर्गिक रबर, एस. बी. आर. सिंथेटिक रबर, कार्बन ब्लॅक संबंधित रसायने, रेआन कॉर्ड व फॅब्रिक, इत्यादी

विविध वस्तूंच्या आजच्या किमतीचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

सरकारने प्राधान्य दिलेल्या उद्योगधंद्यांच्या यादीत रबर व्यवसायाची गणना करावी व त्याचबरोबर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने व्याज दराच्या दृष्टीने सर्वच उद्योगधंद्यांना समान लेखावे व त्यानुसार व्यवहार करावा.

गतवर्षी व्यवस्थापक व कामगार यांचे संबंध फारच आपुलकीचे व जिव्हाळ्याचे असे राहिले, याचे श्रेय दोघांनाही असून त्यामुळे गतवर्षी औद्योगिक शांतता नांदू शकली. माझी खात्री आहे की, दोघांसही लाभदायक असलेली शांतता भविष्यकाळातही टिकेल. कंपनीतर्फे व आपल्या सर्वांतर्फे डायरेक्टर मंडळात नुकतेच समाविष्ट झालेले आणि आता निवडणुकीस उभे असलेले आपले नवे संचालक सौ. जयश्री वैद्य व श्री. बी. जी. वैद्य यांचे मी स्वागत करतो, व त्यांची निवड आपल्या कंपनीला विविधरीत्या लाभदायक ठरेल अशी आशा व्यक्त करतो.

---

### वॉशिंग्टन येथील विठ्ठलमंदिर

विठ्ठलाची एक मूर्ती मद्रासहून वॉशिंग्टनला नुकतीच विमानाने पाठविण्यात आली. संत भद्रगिरी केशवदास ह्या साधूच्या अमेरिकन शिष्यांनी उभारलेल्या मंदिरात त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाईल. वॉशिंग्टनमधील ह्या पहिल्या हिंदू मंदिराचे उद्घाटन स्वामीजी जुलैच्या पहिल्या आठवड्यात करतील.

---

### रजिस्ट्रेशनचे नवे पाकीट

रजिस्ट्रेशनचे नवे पाकीट दिल्ली, मुंबई, कलकत्ता आणि मद्रास येथे मिळू लागले आहे. त्याची किंमत १ रुपया ( त्यात पाकिटाची किंमत १० पैसे ) आहे.

---

### मिझो खेड्यांतील काडीमोड

असाममधील मिझो खेड्यांतून अजून जुन्या पद्धतीनेच काडीमोड होतो. एखाद्या दांपत्यात तंटा झाला, तर पतिपत्नीला एका लहान खोलीत रात्रभर कोंडून ठेवतात. सकाळपर्यंत त्यांच्यात समझोता झाला नाही, तर खेड्याचे पंचमंडळ विवाह विच्छेदन करते. काडीमोडानंतर दोघेही पुन्हा विवाह करू शकतात.

---

### दोन मजली बसेस

नाशिक ते नाशिक रोड स्टेशन ह्या रस्त्यावरील दुमजली बसेसचा प्रयोग यशस्वी झाला आहे; १०५ सीट्सच्या ह्या बसेस वसई–वसई रोड स्टेशन, सांगली–मिरज, नाशिक–त्र्यंबकेश्वर ह्या एस. टी. मार्गावरही चालू करण्यात येणार आहेत.

---





**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमची वैशिष्ट्ये —


* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–३९३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

**BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES**

*Make doubly sure by fitting*



**GADRE BANDHU**
**MADHAVNAGAR (S.R.)**
**INDIA**

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

## बृहन्मुंबईमधील मोडकळीस आलेल्या घरांची सरकारमार्फत दुरुस्ती

### महाराष्ट्र सरकारची स्वागतार्ह योजना

मोडकळीस आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी हाऊस रिपेअर्स बोर्डाची स्थापना करून, घरदुरुस्तीसाठी घरमालकावर पट्टी बसविण्याची योजना महाराष्ट्र सरकार आखीत आहे. मुंबईतील, मुख्यतः मध्य मुंबईतील, जुन्या घरात राहणारांना पावसाळ्यात तर नेहमीच भीतिग्रस्त वातावरणात राहावे लागते. अर्थात, इतर वेळीही राहती घरे पडण्याची उदाहरणे वरचेवर घडत असतात. मोडकळीस आलेल्या घरांतील भाडेकरूंना धोक्याची सूचना देऊन, घर सोडण्यास सांगण्याने उपयोग होत नाही; ते दुसरीकडे राहण्यास जाणार तरी कुठे? बृहन्मुंबईमधील ह्या परिस्थितीवर योजलेल्या उपायाप्रमाणे, रिपेअर्स बोर्डाचे आठ सभासद असतील हे बोर्ड घरमालकाकडून किंवा भाडेकरूंकडून काहीही खर्चाची रक्कम न घेता, ज्यांचेवर पट्टी बसविली आहे किंवा बसविली जावयाची आहे, अशी मोडकळीस आलेली घरे दुरुस्त करून देईल. जी घरे दुरुस्तीच्या शक्यतेच्या पलीकडे नादुरुस्त असतील, त्यांना ही योजना लागू केली जाणार नाही. बोर्डाचे काम तावडतोब सुरू व्हावे, ह्यासाठी बोर्ड मुंबईच्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडून आणि महाराष्ट्र सरकारकडून प्रारंभी कर्ज घेईल. घरदुरुस्तीसाठी बसविण्यात येणारी पट्टी, ह्यासंबंधी कायदा अमलात येईल त्या दिवशीच्या घराच्या जुने-नवेपणावर अवलंबून राहील. अगदी नवीन घरांवरही पट्टी बसविण्यात यावी, म्हणजे त्यांच्या दुरुस्तीच्या वेळेपर्यंत पुरेसे पैसे फंडात साठलेले असतील, अशी एक सूचना आहे. पट्टीच्या रकमेपैकी ९०% रक्कम घरमालक भाडेकरूकडून वसूल करील आणि उरलेली १०% रक्कम त्याला मिळणाऱ्या भाड्यातून तो देईल. घरमालकाकडून ही १००% पट्टी कॉर्पोरेशन वसूल करील. भाडेकरूंनी तीन महिन्यापेक्षा जास्त दिवस ही पट्टी थकविली तर त्यांना भाडेकरू कायद्याचे सध्या मिळणारे संरक्षण मिळणार नाही. बोर्ड नवी घरे बांधून, ह्या योजनेतील घरांतील भाडेकरूंना दुसरी बिऱ्हाडे उपलब्ध करून देईल. बोर्डाने सर्व व्यवहार 'ना नफा, ना तोटा,' ह्या दृष्टीने चालवावयाचा आहे. सरकारी, म्युनिसिपल, सार्वजनिक ट्रस्टच्या, लीव्ह-अँड लायसेन्सच्या कराराखाली घेतलेल्या आणि रहाण्यासाठी न वापरण्यात येणाऱ्या इमारतींवर ही पट्टी बसविली जाणार नाही. रेंट अॅक्ट अंमलात असेपर्यंत आणि त्यानंतर दोन वर्षेपर्यंत ही योजना अमलात राहील. येत्या अधिवेशनात हे बिल असेंब्लीने मंजूर केल्यावर, सरकारला ४ कोटी रुपयांची वसुली होईल, असा अदाज आहे.

बृहन्मुंबईत मोडकळीस आलेली सुमारे ८,००० घरे आहेत. त्याबाबतीत वेळीच उपाय योजले नाहीत, तर १०-१५ वर्षात त्यांची संख्या १८,००० वर जाईल आणि १,६१,३०० कुटुंबे बेघर होतील. तेव्हा, परिस्थिती आवाक्याबाहेर जाण्यापूर्वीच सरकारने केलेल्या उपाययोजना अत्यंत स्वागतार्ह आणि अभिनंदनीय आहे. दुरुस्तीचा खर्च घरमालकांनी केला, तरी रेंट अॅक्टमुळे त्यांना जास्त भाडे घेता येत नाही. तेव्हा घरमालक घरे लवकर पडण्याचीच वाट पाहात असतात. मग त्यांना नवे घर बांधून वाटेल तेवढे भाडे घेता येते. त्याला ह्या नव्या कायद्यामुळे प्रतिबंध होईल.

---

### पाकिस्तानला शस्त्रास्त्रे देण्याविरुद्ध कडक टीका

भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान १९६५ साली झालेल्या युद्धात पाकिस्तानने अमेरिकेकडून मिळविलेली घातक शस्त्रास्त्रे वापरली. वास्तविक ह्या शस्त्रास्त्रांचा वापर रशिया व चीनसारख्या कम्युनिस्ट राष्ट्रांनी आक्रमण केले तर त्याचा प्रतिकार करण्यासाठी करावयाचा होता. अमेरिकेची निदान तशी अपेक्षा होती पण ती फोल ठरली. भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळेपासून अमेरिकेने दोन्ही देशांना शस्त्रास्त्रे देण्याचे बंद केले होते. पण अलीकडे तिऱ्हाइत देशांमार्फत पाकिस्तानला पुन्हा शस्त्रास्त्र-पुरवठा करण्यात येऊ लागला आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क टाइम्स ह्या प्रसिद्ध वृत्तपत्रानेही ह्याबाबतीत अमेरिकन सरकारावर टीका केली आहे. आपल्या संपादकीय लिखाणात हे पत्र म्हणते की अमेरिकेने दिलेल्या शस्त्रास्त्रांचा उपयोग रशिआ अगर चीनपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी पाकिस्तान करणार नाही ही गोष्ट आता स्पष्ट झाली आहे. कारण, ह्या दोन्ही देशांशी पाकिस्तानने चांगले स्नेहाचे संबंध निर्माण केले आहेत. तेव्हा भारताविरुद्धच हा शस्त्रास्त्रांचा साठा करण्यात येत आहे. पेशावर जवळ अमेरिकेचा एक लष्करी तळ आहे. त्याची मुदत लवकरच संपत आहे. ही मुदत वाढवून देण्यासाठी पाकिस्तानला राजी राखण्याचे धोरण अमेरिका स्वीकारत आहे. त्या धोरणाचा एक भाग म्हणून पाकिस्तानला पुन्हा शस्त्रास्त्रे पुरविण्यात येत आहेत.

---

### रॉकफेलरचा प्रचार खर्च

गव्हर्नर नेल्सन रॉकफेलर अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी उभा आहे. रिपब्लिकन कन्व्हेन्शनच्या प्रतिनिधींचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांनी प्रचार सुरू केला आहे. त्याला सुमारे तीन ते साडेतीन कोटी रु. खर्च येईल.

---

### पोस्ट व तार खात्याचा छापखाना

पोस्ट व तार खाते स्वतःच्या छपाईसाठी १·३५ कोटी रु. चा खर्च येणारा स्वतःचा छापखाना सुरू करणार आहे. त्यामुळे दरसाल २·६५ लक्ष रु. ची बचत होईल.

---

## जर्मन मार्कचा २० वा वाढदिवस

### तेव्हा कुणी न विचारणारे चलन आता जगात अग्रेसर

पश्चिम जर्मनीने गेल्या महिन्यात आपल्या युद्धोत्तर चलनाचा २० वा वाढदिवस मोठ्या आनंदाने साजरा केला. १९४८ साली, त्याच्या जन्माचे वेळी, त्याला कुणी विचारीतही नव्हते. जर्मनीच्या पराभवानंतर कारखाने उध्वस्त स्थितीत होते; चलनवाढ, काळा बाजार, अन्नतुटवडा भेडसावीत होते. शहरी लोक दूरवरच्या खेड्यांत जाऊन स्वतःच्या कपड्यांच्या विनिमयात शेतकऱ्यांकडून धान्य घेऊन गुजराण करीत होते. नव्या चलनाला सोन्याचा किंवा परदेशी हुंडणावळीचा आधार नव्हता, तरी त्याने जर्मनीची आर्थिक भरभराट घडवून आणली; जर्मन मार्क हा जगातील सर्वांना हवाहवासा झाला आहे. स्विस फ्रँक ( ज्याला सोन्याचे तारण १००% आहे. ) हाच फक्त त्याची बरोबरी करू शकतो. अमेरिकन डॉलरपेक्षा जर्मन मार्कमधील बाँड्स पैसे गुंतविणाऱ्यांना पसंत पडतात, त्यामुळे मार्कमधील बाँड्स वाढाव्याने विकले जातात, तर डॉलरमधील बाँड्स दर्शनी किंमतीपेक्षा कमी किमतीला विकावे लागतात. गेल्या मार्चमधील सोन्यासाठी जागतिक धडपडीचे वेळी इतर चलनांचे जर्मन मार्कमध्ये रूपांतर करण्यासाठी एकच झुंबड उडाली, त्यामुळे जर्मन बँकांतील परदेशी खात्यांत एका आठवड्याचे अवधीत सुमारे २२५ कोटी रु. किमतीच्या मार्क्सची भर पडली. १९४८ साली, त्या वेळेचा जर्मन अर्थमंत्री लडविक एरहार्ड ह्याने, ज्या सिगारेट्सच्या एका पाकिटाला १,००० मार्क द्यावे लागावयाचे त्या एवढ्या खाली गेलेल्या मार्कचा कायदेशीरपणाच काढून टाकला आणि अशा जुन्या १०० मार्क्सना नवे फक्त ६ ½ मार्क्स देऊ केले. त्याने किमतीवरील नियंत्रणे दूर केली, शिधावाटप रद्द केले. परिस्थिती एवढी बिकट होती, तरी स्वतःच्या भवितव्यावर विश्वास असणाऱ्या करारी जर्मन लोकांनी ह्या प्रयोगास मनापासून पाठिंबा दिला आणि आर्थिक परिस्थिती सुधारून चलतीला चालना मिळाली. आज अमेरिकन डॉलरपेक्षाही जर्मन मार्क अधिक मजबूत गणला जातो. त्यामुळे त्याची प्रतिष्ठा सर्व जगात मान्य केली जाते.

---

### सिगारेट्सचे प्रचंड उत्पादन

१९६६ मध्ये सबंध जगात एकूण २,३८,२०,००,००० सिगारेट्सचे उत्पादन झाले; १९६५ मध्ये ते २,३२,२०,००,००० सिगारेट्स एवढे होते. एकट्या अमेरिकेत त्यापैकी २३% सिगारेट्स बनविण्यात आल्या; रशियात, जपानमध्ये, ग्रेट-ब्रिटनमध्ये आणि प. जर्मनींत त्यापैकी अनुक्रमे १३, ८, ४·८ आणि ४.६% सिगारेट्सचे उत्पादन झाले.

---

## महात्मा गांधी जन्मशताब्दीनिमित्त खास नोटा

### छायाचित्राच्या डिझाइनसाठी स्पर्धा

महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीच्या निमित्त १ रु. पासून १०० रु. पर्यंतच्या वेगवेगळ्या किमतींच्या खास चलनी व बँक नोटा काढण्यात येणार आहेत. त्यावर महात्माजींचे छायाचित्र असेल. त्यासाठी आकर्षक डिझाइनकरिता रिझर्व्ह बँकेने एक स्पर्धा आयोजित केली आहे. भारतातील कोणत्याही चित्रकाराला त्यात भाग घेता येईल. १,००० रु. ची पाच बक्षिसे दिली जातील. अशा बक्षिसांची संख्या वाढविण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार राहील. स्पर्धेसंबंधी तपशीलवार माहिती ( १ ) नॅशनल कमिटी फॉर गांधी सेंटेनरी, राजघाट कॉलनी, नवी दिल्ली १, ( २ ) ललितकला अकादमी, रवींद्रभवन, नवी दिल्ली, ( ३ ) सरकारमान्य सर्व आर्टस व क्राफ्टस कॉलेजे, ( ४ ) मास्टर, इंडियन सिक्युरिटी प्रेस, नाशिक रोड आणि रिझर्व्ह बँकेच्या सर्व कचेऱ्या येथे मिळू शकेल. स्पर्धेसाठी छायाचित्रांची डिझाइन्स पाठविण्याची शेवटची तारीख ३१ ऑगस्ट, १९६८ ही आहे.

---

### कोयनेच्या विजेने अल्युमिनमचे उत्पादन

कोयनेवर उत्पन्न होणाऱ्या विजेचा उपयोग करून अल्युमिनम तयार करण्याच्या कारखान्याला नियोजन समिती आणि भारत सरकारचे अर्थ खाते ह्यांनी मान्यता दिली आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ५५ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. कारखान्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील जागा निवडण्यात आली आहे. कोकणासारख्या मागासलेल्या भागात स्थापन करण्यात येणारा हा पहिलाच मोठा कारखाना आहे. तो उभारण्याच्या कामी हंगेरी अगर रशिया ह्यांचे सहकार्य मिळविण्यात येईल. कारखाना चालू होण्यास ४ वर्षांचा अवधी लागेल. त्याची वार्षिक उत्पादनक्षमता ५० हजार टनांची असेल

---

### भारत चित्रपटनिर्मितीत दुसरा; प्रेक्षकसंख्येत चौथा

दीर्घपटनिर्मितीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो; १९६६ मध्ये भारताने ३१६ चित्रपट तयार केले. जपानने ७१९ चित्रपट तयार करून पहिला क्रमांक मिळविला. हाँगकाँग (१७१), स्पेन (१६०), रशिया (१५९) आणि अमेरिका (१९१) असे इतर देशांचे खालोखाल अनुक्रम आहेत. चित्रपटांच्या प्रेक्षकसंख्येच्या दृष्टीने मात्र भारताचा चौथा अनुक्रम लागतो. रशिया (४२० कोटी), चीन (४०० कोटी), अमेरिका (२२९ कोटी), भारत (१८३ कोटी), इटली (६४ कोटी), स्पेन (४० कोटी) आणि जपान (३७ कोटी) असे ह्याबाबत अनुक्रम आहेत.


किर्लोस्कर
शेतकी यंत्रें
तुमच्या सेवेस हजर
नांगर
कल्टिवेटर
पेरणी यंत्र
इलेक्ट्रिक पंपसेट
अेंजिन पंपसेट
स्लस व्हाल्व
फूट व्हाल्व
STUSA 8/66
नांगर, पंपिंग सेट, पेरणी यंत्रें, कल्टिवेटर, ऊसाचे चरक, स्लूस व्हाल्व, शेगायंत्रें यांसारख्या किर्लोस्कर यंत्रांवर महत्त्वाकांक्षी शेतकरी व बागाईतदार आपलें उत्पादन वाढविण्यासाठीं भरंवसा ठेवतात. शेती व बागाईत यांचें उत्पादन वाढविण्यांत हीं यंत्रें महत्त्वाची कामगिरी बजावीत आहेत.
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे – ९

### रात्रीचा दिवस करणारे स्टारलाइट स्कोप

व्हिएटनाममधील अमेरिकन सैनिक आता इलेक्ट्रॉनिक 'स्टारलाइट स्कोप्स' ह्या बंदुका वापरू लागले आहेत. ह्या उपकरणात अगदी कमीतकमी उजेडही ४०,००० पट मोठा केला जातो; त्यामुळे स्कोपमधून पाहाणाराला रात्रीच्या अंधःकारातही दिवसाइतके स्वच्छ दिसू शकते. व्हिएटकाँग गनिमांना ह्यापुढे रात्रीच्या अंधाराचा फायदा मिळू शकणार नाही आणि त्याचा युद्धावर खूप मोठा परिणाम होईल, अशी तज्ज्ञांची अपेक्षा आहे. ह्या स्कोपमधील नळीत उजेडाचे किरण प्रवेश करतात. त्यातील अगदी बारीक काचतंतूमधून ते जाऊ लागतात. ह्या तंतूंच्या लेन्सच्या मागे रासायनिक फिल्म असते, तिला उजेडाचा स्पर्श होताच ती इलेक्ट्रॉन्स प्रसारित करते. ह्या स्टारलाइट स्कोपच्या रचनेप्रीत्यर्थ अमेरिकेच्या लष्करी खात्याने २० कोटी रुपये खर्च केले आहेत. प्रत्येक स्कोपची किंमत त्याच्या आकाराप्रमाणे, १५ हजार ते ४० हजार रुपये असते.

### लॉर्डांच्या सभेची सत्ता छाटणार

ऱ्होडेशियावरील उपाययोजना अधिक प्रखर करण्यास मंजुरी मागणारी ब्रिटिश मजूरपक्षीय सरकारची सूचना लॉर्डांच्या सभेने नऊ मतांच्या आधिक्याने हाणून पाडली. तेव्हा पंतप्रधान हॅरोल्ड विल्सन ह्यांनी लॉर्डांच्या सभेच्या अधिकारावर नियंत्रण करणारी उपाययोजना करण्याचा आपला विचार जाहीर केला. लॉर्डांच्या सभेत सुमारे १,००० उमराव आहेत, त्यांपैकी ९०० जण पूर्वीच्या उमरावांचे वारस म्हणूनच केवळ तेथे आहेत. १००-उमरावसुद्धा सभांना हजर नसतात. उमरावांत हुजूर पक्षीयांचाच भरणा आहे. ही त्यांची मिरासदारी कमी करण्याचे ब्रिटिश सरकारने ठरविले आहे. उमरावांच्या सभेचे महत्त्व कमी कमी होत चालले असले, तरी ती सभा दिरंगाई आणि अडथळे खासच निर्माण करू शकते.

### अमेरिकेतील धर्मकारणातील अर्थकारण

धर्मकारण हा अमेरिकेतील मोठा धंदा बनला आहे. तेथील धार्मिक संस्थांना कराची माफी आहे. त्याचा फायदा घेणारी सुमारे ३,५०,००० चर्चेस आहेत व त्यांचे उत्पन्न ६,००० कोटी रु. आहे. चर्चेसची मालमत्ता ६०,००० कोटी रु. पेक्षा जास्त आहे. त्यांचे हजारो कोटी रु. शेअर्समध्ये गुंतविलेले आहेत. कित्येक धंदेवाले आपला धंदा त्या धार्मिक संस्थांना विकतात आणि स्वतः त्यांचे मॅनेजर म्हणून पैसे कमवितात. चर्चेसना कर माफ असल्यामुळे त्यांचे नफे वाढतात. चर्चेसच्या १२ कोटी सभासदांपैकी ७·५ कोटी प्रॉटेस्टंट, ४·७ कोटी कॅथॉलिक, ६० लक्ष ज्यू आणि ३० लक्ष ईस्टर्न ऑर्थोडाक्स आहेत.


आमचेकडील आपली ठेव ● आमचेकडून आपले उत्पन्न

| (मुदत) | | (व्याज दर) |
|---|---|---|
| दिवस | ९१ | ५·२५ |
| महिने | ६ | ५·७५ |
| वर्ष | १ | ६·२५ |
| वर्ष | २ | ६·५० |
| वर्ष | ३ | ६·७५ |
| वर्ष | ५ | ७·२५ |
| वर्ष | ७ | ७·५० |
| वर्ष | ९ | ७·६२ |

सेव्हिंग बँक खाते ४·०० व्याज

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

(स्थापना-१९३६)

शाखा एकतीस

मुख्य कचेरी-सातारा

तारेचा पत्ता "मॉर्गेज"

मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७

उपकार्यालय दूरध्वनी क्र २५६५२७

मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक लि., मुंबई

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, डुगल रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने दाटलेल्या कर्जांपोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

ये. स. बोरगांवकर
कार्यकारी संचालक


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८३३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.